फाईल क्र. १६३(२)/२०१८/१४-ब 	दि.२४ मे, २०१९

# महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८

**जाहिरात क्रमांक : २१/२०१८ व अधिसूचना क्रमांक-४३/२०१८**

## अंतिम निकालाची घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे 'सहायक वनसंरक्षक, गट-अ' ची १६ पदे व 'वनक्षेत्रपाल, गट-ब' ची ५३ पदे अशा दोन संवर्गातील एकूण ६९ पदांसाठी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८ चा अंतिम निकाल दिनांक २४ मे, २०१९ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेत **कोल्हापूर** या जिल्ह्यातील **श्री. कसेकर लक्ष्मण महादेव** (बैठक क्रमांक – **MB००११८२**) हे राज्यातून व **अहमदनगर** या जिल्ह्यातील **श्री. दौंड रामदास विष्णू** (बैठक क्रमांक – **MB००२०२४**) हे मागासवर्गीयातून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून **लातूर** या जिल्ह्यातील **श्रीमती काळे प्रतिक्षा नानासाहेब** (बैठक क्रमांक – **MB००१२८९**) या राज्यात प्रथम आल्या आहेत.

२. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व पदनिहाय प्रत्येक वर्गवारीकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut-off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

३. महाराष्ट्र वन सेवा (पूर्व) परीक्षा-२०१८ दिनांक २४ जून २०१८ रोजी मुंबईसह अन्य इतर तीन जिल्हा केंद्रावर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता २९२०६ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून मुख्य परीक्षेकरिता १२२४ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दिनांक २८ ऑक्टोबर, २०१८ रोजी मुंबई केंद्रावर घेण्यात आली आहे. लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी २२१ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले. मुलाखती दिनांक ४ ते १२ एप्रिल, २०१९ या कालावधीत झाल्या.

४. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार **विषयांकित गट- अ व ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक ०४ एप्रिल, २०१८ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व त्यासंदर्भातील उक्त दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहिल.**

५. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त/ शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्रमांक **३.८** पहावी. )

**उप सचिव (परीक्षा-१)**

**ठिकाण : मुंबई** 	**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**